R.N.I. 16775/68 Regd. No. MCW-126/2021-23, Published on 4th of every month



# देशस्थ ऋग्वेदी ब्राह्मण समाचार



एकूण पाने १६ प्रती अंक ₹ ५
वर्ष ५३ वे, अंक २रा, मुंबई एप्रिल २०२२ वार्षिक वर्गणी ₹ ५०

## मनोगत

श्री. प्रभाकर पां. कुलकर्णी (कार्याध्यक्ष)

साष्टांग नमस्कार,

दोन वर्षांच्या प्रदीर्घ अवधीनंतर आपल्या हातात पडलेल्या संस्थेच्या समाचार अंकाचे अनेक सभासदांनी कौतुक केले आहे. त्याबद्दल आपल्या सर्वांचे आभार. हा समाचारचा अंक आपले नवनियुक्त संपादक श्री. मिलिंद सरदेशमुख यांच्या मार्गदर्शनाखाली अल्पावधीत तयार करण्यात आला आहे, याबद्दल श्री. मिलिंद सरदेशमुख यांचे अभिनंदन व आभार!

करोना काळात आपण सर्वांनी अनेक दुःख पचविली आहेत. तसेच आपल्या सभासदांचे नातेवाईकही मृत्यू पावले आहेत. अशा या सर्व सभासदांबद्दल मी संस्थेतर्फे संवेदना व्यक्त करतो व ईश्वरचरणी प्रार्थना करतो की हे सर्व दुःख पचविण्यासाठी देव त्यांना शक्ती देवो. तसेच पुढील काळात सर्वांना चांगले आरोग्य लाभो.

संस्थेतर्फे तसेच संलग्न संस्थांनी करोनाच्या महामारी काळात अनेक समाजउपयोगी कार्यक्रम व उपक्रम राबविले होते. विशेषतः गरजू ब्राह्मण कुटुंबांना आर्थिक मदत, रेशनधान्य पुरविणे, शालेय विद्यार्थ्यांना शैक्षणिक मदत, आरोग्य, रक्तदान शिबिरे आपल्या अनेक संलग्न संस्थांनी या कठीण काळात आयोजित केली होती. या संबंधी विशेष उल्लेखनीय कार्य अहमदनगर, औरंगाबाद, डोंबिवली, नाशिक, कऱ्हाड, पुणे, सोलापूर, मंगळवेढा, विलेपार्ले, ठाणे, मुंबई, या संस्थांनी केले आहे तसेच मध्यवर्ती मंडळानेसुद्धा मुंबईस्थित हॉस्पिटलमध्ये वैद्यकीय सामुग्रीही पुरविली होती.

दिनांक १२ मार्च, २०२२ रोजी कार्यकारी मंडळ व कार्यकारी परिषद यांची संयुक्त सभा पार पाडली. या सभेला दोन वर्षांनंतर उपस्थिती चांगली होती. सभेमध्ये खास निमंत्रित म्हणून संलग्न संस्थांच्या अध्यक्षांना बोलविण्यात आले होते. त्यानुसार दादर, विलेपार्ले, मुलुंड, ठाणे, अहमदनगर, कल्याण, डोंबिवली, नाशिक, सोलापूर, नांदेड, इंदोर, अकोला, भुसावळ, बडोदा या संस्थांचे अध्यक्ष हजर होते. त्यांचा सभेने सन्मान चिन्ह देऊन त्यांनी केलेल्या समाज कार्याचा व संस्थेचा सत्कार करण्यात आला.

ही संयुक्त सभा खेळीमेळीच्या वातावरणात पार पडली. या सभेमध्ये खालील ठराव सर्वानुमते मंजूर करण्यात आले.

१. भाडेकरूंच्या विरुद्ध प्रलंबित असलेल्या सर्व दाव्यांचा पाठपुरावा करून या जागा लवकरात लवकर संस्थेच्या ताब्यात याव्यात म्हणून संपूर्ण ताकदीनिशी प्रयत्न करण्यात यावे.




अखिल देशस्थ ऋग्वेदी ब्राह्मण समाजाची मुखपत्रिका

**समाचार**

वर्ष ५३वे, अंक १ला, मार्च २०२२

(फक्त सभासदांसाठी)

**श्री. विलास जोशी**
अध्यक्ष

**श्री. प्रभाकर कुलकर्णी**
कार्याध्यक्ष

**श्री. प्रसाद ठकार**
कार्यवाह

**श्री. विनोद मांडके**
कोषाध्यक्ष

**संपादक**
**श्री. प्रभाकर अ. संत**

**कार्यकारी संपादक**
**श्री. मिलिंद सरदेशमुख**
मो. : ९८६७९९४३८९

अंकातील मजकूराशी मंडळ सहमत असेलच असे नाही

आजीव सभासद वर्गणी ₹ ५००

प्रति अंक ₹ ५

दूरध्वनी : २४३०२२७३, २४३०७५७३
ई–मेल : aadrbm@gmail.com
संकेतस्थळ : www.adrbmmahim.in


२. भाडेकरूंकडून ताब्यात आलेल्या जागांमध्ये कै. दादासाहेब चौधरी यांच्या नावे वाचनालय व संस्थेचे माजी अध्यक्ष ॲड. माधवराव अनगळ यांच्या नावे अभ्यासिका सुरू झाली आहे. लवकरच ३ ते ४ खोल्या न्यायालयीन निर्णयानुसार आपल्या ताब्यात येणार आहे. या संबंधी सभेने कार्यकारी मंडळाचे कौतुक केले.

३. करोना काळामध्ये ज्या विद्यार्थ्यांचे पालक मृत्यू पावले आहेत अशा ५ विद्यार्थ्यांच्या शिक्षणाची जबाबदारी संस्थेने घ्यावी.

४. समाजातील गरीब ५ कुटुंबांना त्यांच्या मुलीच्या विवाहासाठी प्रत्येकवर्षी रुपये १० हजारप्रमाणे एकूण रुपये ५०,०००/– पन्नास हजार मदत करण्यात यावी.

५. गेल्या वर्षी करोना काळामध्ये सर्व परीक्षा लांबविल्या होत्या व संस्था शैक्षणिक मदत गरजू विद्यार्थ्यांना देऊ शकली नाही. याचा विचार करून शैक्षणिक वर्ष २१–२२ मध्ये हुशार विद्यार्थ्यांना रुपये ४ लाखपर्यंत मदत करण्यात यावी.

## कार्यकारी मंडळ व कार्यकारी परिषद यांची संयुक्त सभा आणि समाचार अंकाचे प्रकाशन (दि. १२ मार्च २०२२)





६. सभासदांच्या आरोग्याच्या गरजा लक्षात घेऊन सर्व सभासदांसाठी सर्व समावेशक सामूहिक गट विमा योजना राबविण्यात यावी. जेणे करून सभासदांना उच्च दर्जाची आरोग्य सेवा अल्प दरात मिळू शकेल त्यामध्ये शक्यतो ३० टक्के अधिभार संस्था देईल व ७० टक्के अधिभार सभासदांना सोसावा लागेल. ही योजना ऐच्छिकरित्या राबविण्यात येईल.

७. आपल्या समाजातील अनेक मान्यवरांनी त्यांच्या कार्यक्षेत्रात उत्कृष्ट कार्य केले आहे त्यांचा ऋग्वेद भूषण म्हणून सत्कार करण्यात यावा.

८. महिला उद्योजक मेळावा घेऊन त्यांना आत्मनिर्भार बनविण्यासाठी प्रयत्न करावेत.

९. समाचार अंक आता आपल्याला वेगवेगळ्या आकर्षित रूपात तुमच्या समोर आणत आहे. यासाठी आपल्या सर्वांचे सहकार्य अपेक्षित आहे. हा समाचारचा अंक आत्मनिर्भार बनविण्यासाठी आपल्याकडून समाचारमध्ये जाहिराती मिळाव्यात ही नम्र विनंती.

१०. या सभेस इंदोरचे प्रसिद्ध उद्योगपती श्री. संदिप तारे यांची ही उपस्थिती होती. त्यांनी इंदौर वरून ५ सभासदत्व अर्ज सभेस सादर केले व मध्यप्रदेशातील देशस्थ ऋग्वेदी ब्राह्मण समाजाचे संघटन उभे करण्याचे सभेला आश्वासन दिले. त्यांनी सांगितले की इंदोर उज्जैन पिटापूर येथे मोठ्या प्रमाणात देशस्थ ऋग्वेदी ब्राह्मण राहत असून त्यांना लवकरच आपल्या संघटनेत आणण्याचा ते प्रयत्न करतील. श्री. तारे यांच्या आश्वासनाबद्दल सभेने त्यांचे टाळ्या वाजवून अभिनंदन केले.

११. देशस्थ ऋग्वेदी ब्राह्मण संघ बडोदाचे अध्यक्ष श्री. नितीन शहापूरकर यांनी मध्यवर्ती मंडळाचे पुढील परिषद बडोदे येथे ऑक्टोबर ते नोव्हेंबर २०२२ मध्ये घेण्यात यावी अशी विनंती केली व तशा प्रकारचे निमंत्रण दिले. सभेने निमंत्रणाचा स्वीकार केला. पुढील परिषद बडोदे येथे घेण्यात यावी असा सर्वानुमते ठराव केला. वर उल्लेख केलेल्या सामाजिक उपक्रमाची माहिती दिली आहे व त्यासाठी सौ. रोहिणी तडवळकर यांच्या मार्गदर्शनाखाली समिती नेमण्यात आली आहे.

सर्व सभासदांना विनंती ही या सामाजिक उपक्रमाचा लाभ घ्यावा व त्या संबंधीचे अर्ज संस्थेला पाठवावेत. आपले सहकार्य व लोभ आहेच. तो वृद्धिंगत होवो. ही समर्थ चरणी प्रार्थना.

।। जय जय रघुवीर समर्थ ।।

## श्रीसमर्थ रामदासांनी श्री रामरायाकडे केलेली प्रार्थना (कोमल वाचा दे रे राम) भाग - १

### स. भ. श्री. मोहनबुवा रामदासी

श्री समर्थांनी रामरायांच्या कृपेसाठी केलेली ही एक प्रार्थना आहे. प्रार्थना ही एक साधकाच्या अंतःकरणातील अवस्था आहे. प्रत्यक्ष भगवंताचा प्रसाद म्हणून ग्रहण करण्याचे, प्रार्थना हे एक माध्यम आहे. प्रार्थना म्हणजे ईश्वराशी संभाषण करण्याचे एक साधन आहे. प्रार्थनेने मन व शरीर यांची अवस्था ईश्वरमय होते. ईश्वराबद्दलचा भाव ज्या शब्दातून व्यक्त करता येतो ते शब्दच प्रार्थनेचे स्वरुप असतात. प्रार्थनेत देहभावाचे विसर्जन आणि आत्मभावाचे जागरण होत असते. हे जागरण म्हणजे प्रार्थनेचं अंतरंग होय.

मला काय हवंय यापेक्षा माझ्या कल्याणाचं जे काही असेल ते, रामा, तू मला दे ही भावना प्रार्थनेत असावी. आपण भगवंताकडे नेहमी नाशवंत मागणे मागत असतो पण भगवंताला आपल्याला खरंच काही

शाश्वत स्वरुपात द्यायचं असतं. श्री समर्थांनी साधक अवस्थेत केलेली प्रार्थना म्हणजे समर्थांची करुणारसांनी युक्त असलेली करुणाष्टके. श्री समर्थांची करुणाष्टके, सवाया, रामनामावली हे सर्वांच्या अंतःकरणाच्या कप्प्यातील मौलिक अलंकार आहेत. श्री समर्थांचे मनाचे श्लोक ही दोनशे पाच मोत्यांची माळ आहे तर करुणाष्टके आणि रामनामावली ही नवविधाभक्तीच्या रुपाने नवरत्नांचा हार आहेत. समर्थांची करुणाष्टके आणि रामनामावलीतून नवविधाभक्तीचे दर्शन घडते. श्री समर्थांनी स्वतः रचलेली अनेक करुणाष्टके आहेत पण सध्या प्रचलित म्हणण्यात असलेली करुणाष्टके काही समर्थ रचित तर काही उद्धवसुत रचित आहेत. स्वतःचं ममत्व, माया, देहभावाचे विसर्जन करण्याची आठवण, आठवणीने करुन देणारी ही श्री समर्थांची करुणाष्टके व रामनामावली आहे.

अंतःकरणात श्रीरामाच्या प्रेमाचा झरा अखंड वाहतो आहे. त्याच रामप्रेमाच्या झऱ्याचा जिथून उगम होतो ते उगमस्थान आहे - श्रीरामांचे कोमल चरण. शुद्ध अंतःकरणातून निर्माण झालेल्या विचारांचा हूंकार म्हणजे समर्थांची करुणाष्टके आणि रामनामावली. करुणारसांनी युक्त असलेली संध्याकाळची करुणाष्टके, पौर्णिमेच्या चंद्राच्या शीतल प्रकाशाची अनुभूती देतात. मनात प्रसन्नतेचा भाव जागृत करतात. तसेच आकाशातील चंद्र-तारे मनातील विचारांच्या वेगवेगळ्या छटांप्रमाणे जाणवतात. भक्तीभावरुपी या प्रकाशमान चंद्राच्या शीतल छायेत अज्ञान अंधःकाराचा निरास करण्याची ताकद असते. या अज्ञान अंधःकाराचा निरास झाल्याशिवाय शीतल चंद्राच्या दैदिप्यमान प्रकाशाचा आनंद घेता येत नाही.

साधकाच्या अंतःकरणातील साधनेची तळमळ, सद्गुरुंची कृपा आणि राम दर्शनाची ओढ तसेच व्याकुळता ज्या शब्दांनी व्यक्त होते ते शब्दच करुणाष्टके होत. भक्तिरसाने ओले चिंब झालेले मनच अंतःकरणात भक्तीभावाचा आणि प्रेम वात्सल्याचा झरा निर्माण करत असते. भवसागराच्या भयाने तप्त झालेले मन शांत आणि शीतल ठेवण्याचे साधन म्हणजे समर्थांची करुणाष्टके आणि रामनामावली. संसाराच्या असारतेतून खरे सार शोधण्यासाठी समर्थांची करुणाष्टके, रामनामावलीतून हे कल्पवृक्षाप्रमाणे साधकाला सारं काही सांगतात! मनाची उद्विग्नता आणि उदासिनता जाणवेल तेंव्हा माझ्या समर्थांचे कोणतेही एक करुणाष्टक म्हणा. एका क्षणात साधक उदासीनतेतून बाहेर येतो एवढी या शब्दात सामर्थ्य संपन्नता आहे. मनाच्या उद्विग्नतेतून उगम पावलेली करुणाष्टके, जेव्हा विवेक आणि वैराग्याची परिसीमा गाठतात तेव्हा रामकृपेची अनुभूती दूर असत नाही.

अंतर्मनाचा इतका सखोल आणि तंतोतंत वेध घेणारी करुणाष्टके, रामनामावली हे भव रोगावरील अनेक रामनाम रुपी वेलींचे आणि वल्लींचे अमृत रसायन आहे. समर्थांची रामनामावली ही रामनाम रुपी नौका आहे. समर्थांच्या सवाया हा सुद्धा एक आध्यात्मिक अर्थांनी भरलेला आणि समाज प्रबोधनासाठी असलेला आणखी एक काव्यप्रकार आहे. (क्रमशः)

**स. भ. श्री. मोहनबुवा रामदासी**
(कार्यकारी अध्यक्ष)
आनंदी - नारायण कृपा न्यास, खातगाव ता. कर्जत जि. नगर. मोबाईलः ९१४६८५५६९१

* युट्युब व फेसबुकवर 'मोहनबुवा रामदासी' या नावाने पेज व चॅनल द्वारे बुवा उपलब्ध आहेत.

* **टीप** : आनंदी-नारायण कृपा न्यास श्रीक्षेत्र खातगाव ता. कर्जत जि. नगर येथे श्रीसमर्थ रामदास स्वामी मठ येथे दि. ८ एप्रिल २०२२ ते दि. १० एप्रिल २०२२ या कालावधीत रामनवमी महोत्सव तसेच श्री समर्थांचाही जन्मोत्सव होणार आहे.

# गुढीपाडवा

## सौ. स्मिता चं. देशपांडे

चैत्रशुद्ध प्रतिपदा म्हणजे गुढीपाडवा. हा हिंदू धर्मियांचा नूतन वर्षाचा पहिला दिवस. पहिला सण. या दिवशी वर्षारंभ साजरा करण्यास नैसर्गिक, ऐतिहासिक व धार्मिक कारणे आहेत. भौगोलिकदृष्ट्या व ज्योतिषशास्त्रानुसार पाडव्याच्या आसपास सूर्य वसंत संपातावर येतो. हा संपात बिंदू, पृथ्वीच्या ग्रहगोलात दर्शविलेले क्रांतीवृत्त व विषुवृत्त ही दोन वर्तुळे ज्या बिंदूस छेदतात तो बिंदू म्हणजे संपात-बिंदू होय. यावेळी साधारण वसंत-ऋतूची सुरुवात होते. झाडास नवी पालवी फुटते. वसंत ऋतूत फुले, फळे यांनी वृक्षसंपत्ती समृद्ध होते. सर्व ऋतूत वसंत ऋतू हा कुसुमाकरी असून हा माझी विभूती आहे असे भगवंतांनी/श्रीकृष्णाने भगवद्‌गीतेत (१०.३५ अध्यायात) म्हटले आहे. यावेळी समशीतोष्ण व उत्साहवर्धक हवा असते. शिशिरऋतूत झाडांची पिकली पाने गळतात व पाडव्याच्या सुमारास नवीन पालवीने बहरून वृक्षवल्ली टवटवीत दिसतात.

या दिवशी श्रीरामाने वालीचा वध केला. राक्षसांचा, रावणाचा वध करून भगवान श्रीराम या दिवशी अयोध्येस परत आले. त्यामुळे अयोध्येत ही 'श्रीरामाची विजयपताका' म्हणजे गुढी उभारण्याची प्रथा पडली. सातवाहन कुलातील शालिवाहन राजाने, शकांनी विजय मिळवून (हुणांचा पराभव करून) या दिवशीपासून 'शालीवाहन शक' सुरू केले. तसेच ब्रह्मदेवाने सृष्टी निर्माण केली म्हणजे सत्ययुगाला आरंभ झाला. गुढीपाडव्याला सुरू होणारे नवीन वर्षाचे कालचक्र हे विश्वाच्या उत्पत्तीकाळाशी निगडित असल्याने सृष्टीत नवचैतन्य निर्माण होते. ही गुढी 'ब्रह्मध्वज' समजून तिची पूजा करतात व ब्रह्मदेवाची प्रार्थना करतात.

पूर्वी 'वसू' नावाचा एक सार्वभौम राजा चेदी देशात होऊन गेला. त्याच्या काळात खूप सुबत्ता होती. त्या वसुराजाच्या मनात कालांतराने वैराग्य वृत्ती निर्माण झाली व त्याने इंद्राची कठोर तपश्चर्या केली. त्यांनी त्याला वेळुची काठी दिली  विमान दिले व राज्यात जाऊन राज्यकारभार करण्यात सांगितले, त्याची आठवण म्हणून या दिवशी वेळूच्या/बाबूंच्या काठीवर गुढी उभारतात. इंद्राने त्याचा वस्त्रालंकार लेवून गौरव केला.

शालिवाहन राजाने शकांचा पराभव करण्यासाठी सहा हजार मातीचे सैनिक तयार करून त्या पुतळ्यात प्राणचैतन्य निर्माण करून फौज सिद्ध केली म्हणजे मातीच्या गोळ्याप्रमाणे थंड व निर्जीव पडलेल्या समाजात नवचैतन्य निर्माण करून अलौकिक पराक्रम केला. त्या पराक्रमाची स्मृती म्हणून त्याने शालिवाहन शक सुरू केला. इसवीसन व शालिवाहन शक यात ७८ वर्षांचा फरक आहे.

गुढीपाडवा हा साडेतीन मुहूर्तापैकी शुभ मानला जातो. ३१ डिसेंबरला रात्री १२ वाजता सुरू होणारे नवीन वर्षांचे कालचक्र हे विश्वाच्या लयकाळाशी निगडित असते.

गुढीपाडव्याच्या दिवशी दारापुढे रांगोळी काढून अभ्यंगस्नान करून दाराला तोरण लावतात. देवपूजा व नवीन पंचागाची पूजा करून वर्षफळ श्रवण करतात. गुढीच्या जागी स्वस्तिक काढून वेळूच्या काठीला स्वच्छ धुवून तिच्यावर गंधाने नक्षी काढतात. काठीच्या टोकास वर भरजरी वस्त्र किंवा खण बांधून सुवासिक फुलांची माळ, कडुलिंबाची पाने, आंब्याची डहाळी, साखरेच्या गाठी त्यावर बांधून त्यावर चांदीचा गडू/फुलपात्र पालथे घालतात. ह्या सर्वांची पूजा करून गुढीला गोड पुरणावरणाचा नैवेद्य दाखवतात. गडूवरही गंधाने नक्षी काढतात. कुंकवाच्या रेखा काढतात, ती पाटावर प्रवेशद्वारापाशी तुळशीजवळ उभी करतात. चैत्र शुद्ध प्रतिपदेस शरीर निरोगी राहण्यास्तव कडुनिंबाची कोवळी पाने, चिंच, गूळ, मिरे, हिंग, ओवा, मीठ हे एकत्र वाटून त्याची

गोळी मुखमार्जनानंतर अनुशापोटी खातात. वात, पित्त, कफ, कृमी, विषबाधा, तृषा यावरील हे औषध आहे. कडुनिंबाच्या पानास 'क्लिरिसिरीन' नावाचे जंतुनाशक द्रव्य असते.

ईश्वरी तत्त्व-तेज व प्रजापतीलहरी खेचून घेण्याची क्षमता आंब्याच्या पानानंतर कडुनिंबाच्या पानात जास्त असते. सूर्योदयाच्या वेळी तेज व प्रजापतीलहरी मोठ्या प्रमाणात कार्यरत असतात. त्यामुळे त्यावेळी गुढी उभी करतात, जीवाच्या पेशीत हे तत्त्व साठवले जाऊन आवश्यकतेनुसार वापरले जाते. गुढी उभारतांना ब्रह्मांडातील शिवशक्तीच्या लहरींना आवाहन करून तिची स्वस्तिकावर स्थापना केली जाते. गुढी उभारताना व सूर्यास्ताच्या वेळी उतरवताना पुढील प्रार्थना करायची असते. ''हे ब्रह्मदेवा, हे विष्णू या गुढीच्या माध्यमातून वातावरणातील प्रजापति-सूमंत सात्त्विक लहरी आमच्याकडून ग्रहण केल्या जाऊ देत व आज दिवसभरात या गुढीत सामावली गेलेली शक्ती त्यातील चैतन्य सातत्याने टिकून त्याचा लाभ आम्हाला मिळू दे. त्या शक्तींचा वापर माझ्याकडून साधनेसाठी केला जाऊ दे ही तवचरणी प्रार्थना!!

सौ. स्मिता चं. देशपांड, पुणे
मो. ९४२२५३३६५३

# केल्याने होत आहे रे...

**वैद्य प्रशान्त अनन्त सुरु**

नव्याने सुरु करत असलेल्या या 'आयुर्वेद- विश्व- स्वास्थ्यासाठी' या मालिकेत मागील अंकात आपण प्रथम - 'मै ना भुलुंगा - मै ना भूलुंगी!' हा विचार वाचला होता. आज आता त्यापुढचा विचार - 'स्मृती' रक्षणाचे सोपे उपाय सांगू इच्छितो.

आयुर्वेदाने 'मज्जा धातुशी', मेंदूशी स्मृतीचा संबंध जाणला होताच. हा मेंदू आपल्या डोक्याच्या भागी, हाडांनी बनलेल्या कवटीच्या पोकळीत सुरक्षित असतो. त्याचे वर- हाडांचे वर, मांस मेद यांचे आवरण असते. मग वर बाह्यत्वचा, केश अशी ही कुपी असते. या कुपिचे गुपित लक्षात घेऊन आयुर्वेदाने साधे सोपे उपाय सुचवले आहेत. तेच मी इथे मांडू इच्छितो.

बघा, जीवनात - निसर्गात जी गोष्ट जशी असते, दिसते, उत्पन्न होते, तशीच ती शरीरात देखील काम करताना आढळते.यालाच आयुर्वेदाचा 'लोक पुरुष साम्य सिद्धान्त' असे म्हणतात. थोडक्यात सांगायचे तर हाच तो बहु चर्चित 'पिंडी ते ब्रम्हांडी' न्याय! - काय म्हणता? उदाहरण देऊन पटवू? अहो मग पहा ना? -

जर्दाळू या सुकामेव्याचा आस्वाद आपण घेतोच की . पण आयुर्वेदाने त्याचा वापर वर्षानुवर्षे व्यवहारात केला आहे. शिवाय बदामाचाही उपयोग आयुर्वेदाने सांगितला आहे. जर्दाळूतला आतला बदाम हा एका कठीण कवचात असतो. जसा आपला मेंदू असतो. त्या कठीण कवचाचे वर मांसल जर्दाळू - गर असतो. जसे आपलेही कवटीचे वर मांसल भाग असतात. त्याचेवर त्वचा, केश असे संरक्षणात्मक भाग असतात. त्यामुळे निसर्गतः ह्या बदामाचे नैसर्गिक कार्य हे मेंदूच्या विविधं भागांना पोषक अंश पुरवण्याचे असते. जे जसे दिसते, तसेच ते काम करताना आढळते. अक्रोडाचा आतील भाग हा मेंदूच्याच आकाराप्रमाणे दिसतो. त्यातला तैल

**भावपूर्ण श्रद्धांजली...**

**'समाचार'च्या अंकात मार्गदर्शन करणारे वैद्य प्रशांत अनंत सुरु यांच्या सुविद्य पत्नी डॉ. सौ. प्रफुल्लता प्रशांत सुरु यांचे दुःखद निधन. श्री. सुरु यांच्या दुःखात आम्ही सहभागी आहोत!**

अंश हा देखील मेंदूला तरतरी आणायला उपयुक्त असतो. याला 'सामान्य विशेष सिद्धान्त' असे म्हणतात.

स्मृती वाढीसाठी योग्य त्या प्रमाणातच बदाम (२ ते ४ पुरे) किंवा १/२ ते १ अक्रोड – ( वरचे कवच फोडून आतला भाग) खावा. परवडते किंवा आवडते म्हणून जास्त खाऊ नये. नाहीतर त्याचेमुळे अपचन होऊन पोटाचे विकार होण्याची, लक्षणे दिसण्याचीही शक्यता राहते.

बदाम पाण्यात भिजवून ४ तासानंतर घ्यावा. त्याचे वरचे तपकिरी साल काढून पांढरा गर खाणे उत्तम. त्यामुळे पित्त वाढण्याचे प्रमाण कमी राहते. मोठा, टपोरा बदाम खाण्या पेक्षा 'आकाराने छोटा – मामरा बदाम' अधिक गुणकारी ठरतो. पित्त होऊ शकणाऱ्या व्यक्तींनी अक्रोडाचे – वळ्या आणि उंचवटे पाहून, पाण्यात भिजवून खाणे इष्ट. त्यातला तैलांश पोटात जाणे उपयुक्त असते.

बुद्धीच्या सत्व गुणांतून स्मृतीचा उगम होत असतो. म्हणून ज्या ज्या आहार. कर्म. व्यायाम यांनी 'सत्व' गुणांची वाढ होईल अश्या गोष्टी, स्मृती वाढवायलाही मदतनीस ठरतात.

यामध्ये – पुरेशी आणि योग्य कालावधीची झोप घेणे, इतर मानसिक भावनांचा उद्रेक होऊ न देणे. उदाहरणार्थ– क्रोध, शोक, भय, चिंता लोभ, मोह, हिंसात्मक विचार, नैराश्य, मत्सर आदि भावनांचा अयोग्य परिणाम स्मृतीवर थेट परिणाम घडवतो. त्यांना खरे तर थाराच देऊ नये. पण आपण सारे काही – 'सुख दुःख समे कृत्वा..' वृत्तीने राहणे अवघड असते. प्रयत्न करून पाहत राहावे.

खूप उशीरा किंवा खूप जड अन्न खाऊ नये. फार तळकट – जळजळीत. मसालेदार, शिळे, गार, नासवलेले असे आहारीय पदार्थ टाळलेच पाहिजेत. या उलट शक्यतो गाईचे दूध – तूप – लोणी, ताक असे सत्वप्रधान पदार्थ खावेत. दही मात्र टाळण्याच्या यादीत ठेवावे. या साऱ्या गोष्टी मज्जा धातु, मेंदू या निगडीत स्निग्ध गुणाशी संबंधित आहेत.

पूर्वी काळापासून आपल्याकडे – कुशाग्र – sharp – बुद्धी आणि तैल बुद्धी यांना महत्त्व दिलेले आढळते. मधुर – गोड चवीचे स्निग्ध असे ओले खोबरे, दूध, तूप, लोणी; प्रसंगी 'सुवर्ण'– सोन्यासारख्या धातूचे किंवा 'रजत' – चांदी – या धातूंच्या भस्माचा वापर औषध म्हणून, औषधाच्याच मात्रेत – तज्ञांचे सल्ल्यानेच करता येतो. बुद्धी ची देवता श्री गणेशाला ओल्या खोबरे– गुळाचे मोदक आवडण्याचे हे रहस्यही असू शकेल.

'सुवर्ण' हा मेधा वाढवणारा धातु आहे, म्हणून प्रत्येकाने तो भस्म रुपात घेतलाच पाहिजे असे नसते. पण, आपल्या लहान बालकांना जी गुटी देतात, त्यातही सुवर्ण आणि वेखंड – वचा, यांचे ३ /३ वेढे औषध म्हणून देण्याची योग्य प्रथा आहे. त्याचे उत्तम परिणाम, एक वैद्य म्हणून मी आणि अनेकांनी अनुभवले आहेत. सोन्याचे वळे टाकून, २० मिनिटे उकळलेले पाणी हे बळ देण्यासाठी, स्मृती साठी आणि एकूणच व्याधि क्षमत्व–, प्रतिकार क्षमता resistance / immunity वाढवण्यासाठी लाभदायक ठरते.

ब्राम्ही, जटामांसी, वेखंड, शंखपुष्पी, तगर, ज्योतिष्मती अशा इतर वनस्पती देखील, प्रकृतीचे गरजेनुसार वापरता येतात. पचायला हलक्या खिरी, सुकामेव्यातील – बदाम, अक्रोड, खारीक, मनुका, देवाला नैवेद्य म्हणून दिले जाणारे पंचामृत –(दूध, तूप, लोणी खडीसाखर आणि – दही न वापरता मध) यांचा वापर रोजच्या आहारात असायला हवा.

प्रदूषण विरहीत वातावरण, स्वच्छ सूर्य प्रकाश यामुळे मन प्रसन्न होते आणि ऊर्जाही मिळते. कार्यक्षमतेत वाढ होते. अंधारी, कुबट वासाची आणि अस्वच्छ जागा, गुदमरावे असे वातावरण हे टाळायलाच पाहिजे. सुगंध – अत्तरे, मंद वासांची फुले, सुवासिक फवारे, यामुळेही स्मृती वाढू शकते. प्रसन्न असे ताजे पदार्थ असावे. रसरशीत अन्न हवे. परिसर स्वच्छ आणि उजेड असेल, असे घर, कार्यालय हवे. तेथील रंग संगती उजेड असणारी, आणि आनंददायी हवी. सुंदर दृष्ये दिसावीत. छान मनाला रिझवेल असे संगीत किंवा शब्द ऐकता यावेत.

अशा साऱ्या गोष्टी स्मृतीमध्ये वाढीला मदत करतात. परत परत वाचन, पाठांतर, श्रवण, मनन, चिंतन, चर्चा संवाद अशा विविधं प्रकारांनी स्मृती रक्षण करता येते. काही विशेष स्तोत्रे, मंत्र, ग्रंथ यांची मदत होते. श्री गणपतीचे अथर्व शीर्ष , कार्तिकेयाचे - प्रज्ञा वर्धन स्तोत्र, राम रक्षा, मारुती स्तोत्र ह्यांनीही - अधिकस्य अधिकं फलं ... म्हणून लाभ होतोच. योगासने, प्राणायाम, ध्यान, धारणा , सकारात्मक विचारशैली यांनीही स्मृती वर्धन होते. आयुर्वेदाने सांगितलेले सद्वृत्त, आचार रसायन आणि योग्य रुपात ब्रम्हचर्य पाळावे.

थोडक्यात काय - आहार, विहार, व्यायाम, औषध, नीती, यम-नियम, योगासने, ध्यान, समाधी - (ज्यांना जमेल त्यांनी) आणि मनोबल उत्तम राखले, मन- इंद्रिये यांना ताप न देता प्रसन्न राखले तरीही सर्व उपयुक्त गुण लाभतात. जीवन सुकर होते.

म्हणून श्री समर्थ रामदास स्वामी म्हणतात - केल्याने होत आहे रे । आधी केलेची पाहिजे । यत्न तो देव जाणा । अंतरी धरिता बरे ...।।

**वैद्य प्रशान्त अनन्त सुरु**
संपर्क : ९८२२८८५९५२ / ०२०२४३३३६६३

# तेलाचे अर्थशास्त्र आणि भारतीय अर्थव्यवस्था

**उदय तारदाळकर, मुंबई (मो. ९९२०८०५८२२)**

रशिया आणि युक्रेन ह्या दोन देशांमधल्या युद्धाला आता एक महिना झाला. जगभरातील देशात एक प्रकारची मोठ्या प्रमाणात फूट पडल्याचे दिसते. अमेरिका आणि पाश्चात्य देश रशियावर टीका करत असताना मोठ्या प्रमाणात निर्बंध लादत आहेत. भारत आणि चीन मात्र ह्याबाबतीत वेगळा पवित्र घेताना दिसत आहेत. भारताचा इतिहास पाहता भारत रशियाच्या बाजूने असणार ह्यात काही शंका असण्याचे कारणच नव्हते.

संपूर्ण जागतिक अर्थव्यवस्था एका शृंखलेत गुंतली असताना वेगवेगळ्या वस्तू विशेषतः पोलाद, ॲल्युमिनिअम आणि निकेल हे तीन धातू आणि सेवा ह्या उपभोक्त्याकडे कशा पोहोचणार हा प्रत्त्येक युद्धात निर्माण होणारा प्रश्न निर्माण झाला.

बरेच देश दुटप्पी धोरण आखत आहेत. मध्यवर्ती बँकाच्या शिथिल धोरणाने महागाई वाढत असताना युद्धाचा भडका उडाल्याने एकंदर दळणवळणात बाधा निर्माण झाली आणि त्याचा परिणाम वस्तूंच्या किमती वाढण्यात झाला.भारताच्या ताज्या महागाईच्या आकडेवारीवरून असे दिसून आले आहे की, फेब्रुवारीमध्ये वाढत्या किंमतींचा परिणाम आणखी वाढला आणि सलग दुसऱ्या महिन्यात महागाई निर्देशांक रिझर्व्ह बँक ऑफ इंडियाच्या २-६ टक्के ह्या महागाई सीमित ठेवण्याच्या पट्ट्याच्या वर गेला. गेल्या महिन्याच्या अखेरीस युक्रेनवर रशियन आक्रमणाचा परिणाम होण्यापूर्वीही ते होते. फेब्रुवारी महिन्यात व्यापार तूट वाढून १७.९४ अब्ज डॉलरवर गेली, इंधनआयातीच्या हा परिणाम असून पुरवठ्याच्या चिंतेमुळे जागतिक ऊर्जेच्या किमतीत झालेल्या वाढीमुळे चिंतेत भर पडली आहे. कच्च्या तेलाच्या किंमतीत १००/१२० डॉलर प्रति बॅरलपेक्षा जास्त वाढ झाली आहे आणि युक्रेनच्या आक्रमणाला प्रत्युत्तर म्हणून पाश्चिमात्य देशांनी रशियावर घातलेले निर्बंध आणि तेल आयात बंदीनंतर तेलाच्या पुरवठ्याच्या चिंतेत भर पडली.

दरवाढ ही तेल-वायू किंवा ऊर्जेपुरती मर्यादित नसून गेल्या दीड वर्षात कित्येक वस्तूंच्या किंमती सातत्याने वाढत आहेत.पोलाद,अल्युमिनियम आणि निकेल या तीन धातूंच्या वाढत्या किंमती ही मोठी चिंता आहे . मार्च महिन्यात अल्युमिनियमच्या दराने विक्रमी उच्चांक गाठला विशेष म्हणजे एका आठवड्यात दरामध्ये तब्बल

१३ टक्क्यांची वाढ झाली शिवाय निकेलने ११ वर्षांतील उच्चांक गाठला. युक्रेन आणि रशियावरील सध्याच्या संकटाचा परिणाम म्हणून कच्चे तेल आणि कोळशाच्या किंमती वाढल्याने ऊर्जेच्या किंमती झपाट्याने वाढतील.जागतिक खनिज उत्पादनाच्या ४५ टक्के हिस्सा असलेल्या असलेल्या ओपेक आणि इतर देशांची (रशियासह)२३ सदस्य असलेल्या गटाची बैठक २ मार्च रोजी केवळ १३ मिनिटे चालली. यात आश्चर्य वाटण्यासारखे काहीच नाही कारण युद्धजन्य परिस्थितीमुळे तेलाचा पुरवठा कमी झाल्याने होणारी भाववाढ ही त्यादेशांच्या पथ्यावर पडली आहे.

भारताच्या अर्थव्यवस्थेवर होणारा परिणाम गंभीर असू शकतो, अशी चिंता अनेक तज्ज्ञांना वाटते. सुरवातीला शेअर बाजार निर्देशांक जवळपास १० टक्क्यांनी घसरले असले तरी पाच राज्यांच्या निवडणूक निकालानंतर त्यात सुधारणा झाली. भांडवल बाजारात मार्च २०२० पासून खूप मोठ्या प्रमाणात उलथापालथ झाली. कोरोनाच्या महामारीने अर्थव्यवस्थेचा कणा मोडला होता. आर्थिक क्षेत्र पूर्णतः ठप्प झाले. अर्थातच त्याचा परिणाम भांडवल बाजारावर झाला. कित्येक कारणांमुळे भारताचा २०१९-२०२० चा विकास दर बेताचा होता. केंद्र सरकारने केलेल्या कंपन्यांवरील कर कपातीमुळे काही प्रमाणात आशा निर्माण झाली होती. परंतु नवीन वित्तीय वर्षाची सुरुवात कोरोनामुळे खराब झाली. कोविडच्या उद्रेकानंतर समभागामधील विक्रीमुळे २०२० च्या पहिल्या तीन महिन्यात भांडवल बाजार हळू हळू सावरू लागला.एप्रिल २०२० ते जून २०२१ ह्या कालात डिमॅट खातेदारांची संख्या चार करोड पासून तब्बल सव्वा सहा करोड पर्यंत पोहोचली. १९९६ साली डिपॉझिटरी प्रणाली सुरु झाली.चार करोड खात्यांचा पल्ला गाठण्यास २५ वर्षे लागली तर त्या नंतरची सव्वा दोन करोड खाती अवघ्या सव्वा वर्षात उघडली. सध्या भारतात सुमारे ८.६ करोड डिमॅट खाती आहेत.वाढती महागाई आणि बँकांच्या मुदत ठेवींवरचे घसरते व्याज दर अशा विवंचनेत असलेले गुंतवणूकदार भांडवल बाजाराकडे वळले. महागाईचा दर पाच टक्क्यांचा आसपास आणि दीर्घ मुदत ठेवींवरील व्याज पाच ते साडे पाच टक्क्याच्या पट्ट्यात असताना भांडवल बाजारासारखा जोखमीचा परंतु अधिक परतावा देण्याची उमेद असणारा पर्याय गुंतवणूकदारांनी निवडला.

अलिकडच्या काळात खनिज तेलाच्या किमती वाढल्या आहेत, ज्यामुळे भारतासारख्या देशांवर मोठा भार निर्माण झाला आहे. भारताला तेलाची आयात मोठ्या प्रमाणात करावयास लागते . मागणीच्या ८२% टक्के तेल आयात करावे लागते. कोरोना महामारी पश्चात मागणीमध्य सुमारे ८% वाढ झाली आहे. ह्या घडीला जरी शेअर बाजार सावरला असला तरी खनिज तेलाचे भाव ७० ते ८० अमेरिकी डॉलरच्या घरात येईपर्यंत अर्थव्यवस्थेला धोका आहे हे निश्चित. अमेरिका, ब्रिटन आणि इतर पाश्चिमात्य देश भारताला रशियन तेल आणि वायू खरेदी टाळण्याचे आवाहन करत आहेत. माध्यमातील बातम्यांनुसार रशिया भारताला बाजार भावापेक्षा २०% कमी तेल खरेदीवर सूट देत आहे.

एक अत्यंत दिलासा देणारी गोष्ट म्हणजे भारताने ४०० अब्ज डॉलरच्या वस्तूंच्या निर्यातीचे महत्त्वाकांक्षी लक्ष्य ठेवले होते आणि हे लक्ष्य पहिल्यांदाच गाठले आहे. शिवाय भारताकडे परकीय गंगाजळी ही सुमारे ६३० अब्ज अमेरिकी डॉलर असल्याने आंतरराष्ट्रीय बाजारात सुस्थिती आहे.

## झाडांच्या सावलीत

**सौ. स्वाती काळे (मो. ९८९२७८९००२)**

आमच्या लहानपणी आंब्याचे झाड कायमच मित्रासारखे पाठराखण करायचे. वसंताची चाहूल लागायची आणि आम्र मंजिऱ्यांनी गच्च भरलेला आम्रवृक्ष आमचं अखखं आयुष्यच सुगंधित करायचा. हवेच्या झोक्यावर

डुलणाऱ्या हिरव्याकंच कैऱ्या डोक्यावर टपली मारायच्या. लपाछुपीला आडोशाला जायचं ते आंब्याच्या झाडामागेच . नंतर हातापायाला चिकटलेल्या मुंग्या झटकून झाडाच्या फांद्यांवर सांजवेळेपर्यंत लटकत बसायचं. सकाळचा आमचा अलार्मही तोच एखाद्या फांदी आडून द्यायचा. भल्या पहाटे कोकिळेची कुहूकुहू ऐकली की आमची साखरझोप मोडायची. तोंडाला फोडे आली तरी बेहत्तर पण करकरीत कैऱ्या तिखट-मीठ लावून खाल्ल्याशिवाय आमचा दिवस जात नसे.

उगीच नाही आम्रवृक्षाला कल्पवृक्ष म्हणतात. अतिशय प्राचीन, दैवी आणि बहुगुणी असा हा वृक्ष पुरुष आहे. रामायणात आम्रमंजिर्यांचा सुगंध घेऊन इकडे तिकडे धावणाऱ्या वाऱ्याचे बहारदार वर्णन आहे. महाभारतात तीर्थ पर्वात पांडवांनी आम्रवृक्षाचे सुरेख वर्णन केले आहे. भगवान गौतम बुद्ध लुंबिनी मध्ये साल आणि आम्रवृक्ष यांच्या छायेत जन्मले त्यामुळे बौद्ध धर्मालाही हा वृक्ष प्रिय आहे.

गौतम बुद्धाच्या अगोदरच्या जन्मांच्या अनेक रोचक जातक कथा आहेत. त्यापैकी महाकपी जातक कथा महत्त्वाची समजली जाते. बुद्धाचा जन्म महाकपी वानर म्हणून झाला होता. तो आणि त्याची ऐंशी हजार वानर प्रजा गंगा नदीच्या किनाऱ्यावर एका विशाल वृक्षाखाली राहायचे.महाकपी सांगायचा की एकही आंबा खाली जमिनीवर पडू देऊ नका कारण जर एखाद्या माणसाच्या हाती लागला तर तो वृक्षावर धडक मारेल आणि आपल्याला मारून टाकेल. शेवटी व्हायचं तेच झालं. एकदा चुकून एक आंबा खाली पडला आणि नदीत प्रवाहात वाहत गेला. काशीचा राजा ब्रह्मदत्त त्याच वेळी नदीत स्नान करीत होता.त्याच्या हाती हे आम्रफळ लागले. या फळाच्या सुवासाने आणि चवीने राजा वेडा झाला. झाडाच्या नादापायी त्याच्या संपूर्ण सैन्याने अरण्याला वेढा दिला आणि वानरांना मारण्याचे आदेश दिले.महाकपीने झाडापासून सुरक्षित स्थळापर्यंत सेतू बांधण्यास सुरुवात केली. पण बांबू कमी पडल्याने महाकपीने स्वतःचे शरीर सेतू म्हणून वापरण्यास दिले आणि स्वतःची प्रजा वाचवली. ब्रह्मदत्त हे दृश्य पाहून अचंबित झाला. महाकपीला बोलावून त्यांनी त्याचा यथोचित सन्मान केला. महाकपीने देखील प्रजेचा सांभाळ कसा करावा यावर ब्रम्हदत्ताला काही मूलभूत सूत्रे सांगितली परंतु अंगावर असंख्य वेदना झेलत हा महान योद्धा महाकपी लवकरच मरण पावला.

जैन तीर्थंकर नेमिनाथ यांना देखील याच वृक्षाच्या खाली ज्ञान प्राप्त झाले. त्यामुळे जैन तत्वज्ञानात आम्रवृक्षाला फार महत्त्व आहे.

भगवान शंकर ‘पती’ म्हणून प्राप्त करण्यासाठी पार्वतीने एका पायावर उभी राहून याच वृक्षाखाली तपश्चर्या केली.कामदेवाचा बाण आम्रमंजिऱ्यांनी बनविला असतो, असे कालीदासाचे रम्य वर्णन आहे. आम्र फळ म्हणूनच प्रजजनाचेही प्रतीक आहे.

कामाक्षी देवी म्हणजे पार्वतीचे आणखीन एक रूप. तिची गोष्टही फार लोभस आहे. तिने वाळूचे लिंग तयार करून आम्रवृक्षाखाली पती प्राप्तीसाठी घोर तपश्चर्या केली. शेजारच्या वेगवती नदीला मत्सर वाटला आणि तिने प्रवाह सोडून तपश्चर्येत अडथळा आणण्याचा प्रयत्न केला. कामाक्षी देवीनी तरीही आम्र वृक्षाखालची जागा सोडली नाही. तिची निष्ठा पाहून भगवान शंकर प्रसन्न झाले आणि त्यांचा विवाह झाला.

कालिदासाच्या शाकुंतल नाटकात कण्व ऋषि म्हणतात, खूप वर्षांपासून मी एका आम्रवृक्षाच्या शोधात होतो. दुष्यंताच्या रूपाने मला तो मिळाला. आता माझ्या नाजूक लतिकेशी म्हणजेच शकुंतलेशी मी त्याचा विवाह लावून देणार.

अजूनही अनेक समाजांमध्ये नवरदेव आंब्याच्या झाडाच्या फांदीवर बसतो. काही आदिम जमातींमध्ये वधुवर विवाह बंधनात अडकण्यापूर्वी आम्रवृक्षाला प्रदक्षिणा घालतात.

चार हजार वर्षांहूनही प्राचीन असलेल्या हा दैवी वृक्ष!

सूर्यदेवाची कन्या सूर्याच्या मागे एकदा एक चेटकीण लागली होती. सूर्याने एका तळ्यात उडी मारली आणि तिचे कमळ फूल झाले. चेटकिणीने ते कमळफूल जाळले आणि त्या राखेतून आम्र वृक्षाचा जन्म झाला असे म्हणतात. असेही म्हणतात की हनुमानाने लंकेतून हे झाड आणले.

जेव्हा अलेक्झांडरच्या सैन्याने येथे इसवी सन पूर्व ३२७ मध्ये आक्रमण केले तेव्हा सर्वप्रथम बाह्य जगताला या वृक्षाची ओळख झाली अशीही एक गोष्ट आहे. आम्रवृक्षाच्या जन्माची कारणे कोणतीही असोत पण मनामनाला सुगंधी करणारा आणि अमृताची चव देणारा हा आम्रवृक्ष आपल्या इतिहासाची आणि संस्कृतीची समृद्ध जाणीव करून देतो. ऋतूंना रंग असतात त्याचप्रमाणे रस आणि गंधही असतात. या रसरंगगंधाचे मूक साक्षीदार असंख्य ऋतूंमध्ये पाय रोवून आपल्यावर मायेची सावली धरत असतात.

## नाथ षष्ठी

नाथांचे कर्तृत्व सर्वश्रुतच आहे. नाथांचे वडील सूर्यनारायण, आजोबा चक्रपाणी! नाथांचा सांभाळ या आजेबांनीच केला. नाथांचा जन्म मूळ नक्षत्रावर झाल्यामुळे त्यांच्या नशिबी पितृसुख नव्हते. वडिलांचे छत्र ढळल्यावर आजोबांनीच नाथांवर संस्कार केले ते काय प्रतीचे होते ते तुम्ही सारे जाणताच. नाथांचे पणजोबा म्हणजे संत भानुदास हे स्वतः वारकारी होते.

शके १५२१ फाल्गुन वद्य षष्ठीला एकनाथ महाराजांनी समाधीी घेतली म्हणून या षष्ठीस नाथषष्ठी म्हणतात. नाथांच्या आयुष्यात या षष्ठीला फार महत्त्व आहे. जनार्दन स्वामींचा जन्म, जनार्दन स्वामींना दत्ताचे दर्शन, नाथांना जनार्दन स्वामींचा अनुग्रह, जनार्दन स्वामींची समाधी आणि नाथांची समाधी या सगळ्या गोष्टी या एका तिथीला झाल्या. नाथांनी संसार करून परमार्थ केला. एकनाथी भागवत ही भगवंताच्या अकराव्या स्कंदावरील टीका प्रसिद्ध आहे. ज्ञानेश्वरीची मूळ प्रत मिळवून ती शुद्ध करण्याचे कामही एकनाथांनी केले. स्पृश्य, अस्पृश्य हा भेद नाथांनी कधीही मानला नाही. काशीहून रामेश्वराला न्यायच्या कावडीतील गंगेचे पाणी नाथांनी तहानेने तळमळणाऱ्या गाढवाला पाजले.

ज्या नाथांच्या घरी साक्षात ईश्वराने श्रीखंड्या बनून पाणी भरले त्या नाथांच्या घराण्याचा हा कुलवृत्तांत एकदा नाथ गोदावरीवरून स्नान करून येत होते. एक यवन त्यांच्यावर थुंकला. नाथांनी परत जाऊन आंघोळ केली. तो परत थुंकला. असे नाथांनी त्या दिवशी १०८ वेळा स्नान केले. शेवटी यवन थकला. नाथांची क्षमा मागून त्याला नाथ म्हणाले, 'वेड्या, मी तुझा आभारी आहे. तुझ्यामुळे मला आज १०८ वेळा गोदावरी स्नान घडले.' काय हा संगम! नाथषष्ठीला भानुदास, एकनाथ नाम घोषणांच्या गदारोळाने पैठणचा आसमंत भरून जातो.

समाजाच्या सर्व थरात परमार्थ शिरावा यासाठी नाथांनी फार खटाटोप केला. नाथांचे समाजावर असे अपार उपकार आहेत म्हणून नाथषष्ठीचा उत्सव गावोगाव होतो. नाथषष्ठी म्हणजे फाल्गुन पक्षात येणारी षष्ठी. तिथी एवढाच या षष्ठीचा अर्थ नाही तर एकनाथ महाराजांच्या जीवनात या सहा महत्त्वाच्या घटनांनी त्यांची त्यांच्या सद्गुरूशी झालेली एकरूपता जणू सिद्ध होत आहे. परामर्थ सफल व्हावयाचा असेल तर ६ गोष्टी एकत्र आल्या पाहिजे. १ शिष्य, २ गुरू, ३ सेवा, ४. उपदेश, ५ स्नान, ६. कृतार्थता प्राप्त झाली म्हणजे गुरूचे गुरुपण संपते. शिष्याचे शिष्यपणा संपते व दोघांचे एकाच तिथील म्हणजे एकाच क्षणात निर्वाण होते. गुरु आणि शिष्य एकरूप होतात.

नाथ षष्ठीमध्ये हे सहा योग एकत्र येतात. षष्ठी म्हणजे सहाचा समुदाय. काम, क्रोध, मोह, लोभ, मद, मत्सर या षडरिपूंच्या समुदायाने आपल्याला अनाथ केले आहे. दीन केले आहे पण श्रीसंत एकनाथ महाराजांनी या सहांना जिंकले होते म्हणून ते नाथ झाले याला नाथषष्ठी म्हणतात.

(संकलन - मिलिंद सरदेशमुख)

# ऋग्वेद भूषण - डॉ. आशुतोष रारावीकर

आज आपण ओळख करून घेऊया आपल्यातील एका असामान्य व्यक्तिमत्वाची ज्यांचं नाव आहे डॉ. आशुतोष यशवंत रारावीकर. नामांकित अर्थशास्त्रज्ञ. रिझर्व बँक ऑफ इंडिया मध्ये संचालक पदावर



कार्यरत. त्यांचा जन्म नाशिक येथे सुसंस्कृत देशस्थ ऋग्वेदी ब्राह्मण कुटुंबात झाला. वडील प्रा. डॉ. यशवंत रारावीकर हे विख्यात अर्थशास्त्रज्ञ व आई प्रा. डॉ. अरुणा रारावीकर या संस्कृत साहित्यिक असल्याने अर्थशास्त्र व साहित्य या दोन्हीचे बाळकडू त्यांना मिळाले. त्यांची शैक्षणिक पार्श्वभूमी समृद्ध आहे. बारावीत ते बोर्डात सर्वप्रथम आले व सुवर्णपदकाचे मानकरी ठरले. अतिशय बुद्धिमान असलेले आशुतोष नंतर उच्चविद्याविभूषित झाले. शिक्षणाच्या सर्व काळात त्यांना शासकीय शिष्यवृत्या प्रदान झाल्या. अर्थशास्त्रात केंद्र सरकारच्या फेलोशिपसह डॉक्टरेट, एम.बी.ए., गणिती व सांख्यिकी अर्थशास्त्रासह पुण्याच्या गोखले अर्थशास्त्र संस्थेत एम.ए., नेट, सी.ए.आय.आय.बी., अमेरिकेतील सीएफए इन्स्टिट्यूट व आय.एम.एफ. - हार्वर्ड - एम.आय.टी. यांच्या प्रमाणपत्रांचे ते मानकरी झाले. आर्थिक क्षेत्रात अनेक महत्त्वाच्या पदावर त्यांनी कार्य केले. भारत सरकारच्या अर्थ मंत्रालयात त्यांनी संचालक पदावर काम केले, तसेच आंतरराष्ट्रीय पातळीवर सुद्धा आर्थिक क्षेत्रात सहभागी राहिले. अर्थशास्त्र, साहित्य यासह अनेक क्षेत्रात त्यांना अमर्त्य सेन पुरस्कार, साहिर लुधियानवी पुरस्कार अशा दोनशेहून अधिक प्रतिष्ठित सन्मानांनी गौरवण्यात आले आहे. दूरदर्शनतर्फे निर्मित-प्रसारित त्यांच्या जीवन-कार्यावर आधारित विशेष कार्यक्रमात 'यशाच्या शिखरावरील बहुआयामी प्रतिमेचा मनोहर कोहिनूर हिरा' अशा शब्दात त्यांचा गौरव झाला. विविध दूरचित्रवाहिन्या व आकाशवाणी यांच्या कार्यक्रमात तसेच राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय नियतकालिके व वृत्तपत्रे यामध्ये त्यांच्यावर व त्यांच्या पुस्तकांवर अनेक प्रशंसापर लेख व कार्यक्रम प्रसिद्ध झाले आहेत. बालपणापासून कुसुमाग्रजांचा प्रदीर्घ सहवास लाभलेले ते चतुरस्त्र लेखक असून आर्थिक व ललित-वैचारिक अशी त्यांची शंभरहून अधिक लेखन-संपदा आहे. अर्थशास्त्र लालित्यपूर्ण करणारा आणि ललित-साहित्य अर्थपूर्ण लिहिणारा असा हा प्रतिभाशाली लेखक. साहित्य संमेलनाचे पूर्वाध्यक्ष उत्तम कांबळे यांची प्रस्तावना लाभलेला त्यांचा 'यशपुष्प' हा नाविन्यपूर्ण व सर्वांगसुंदर ग्रंथोबा अल्पावधीत लोकप्रिय झाला व मराठी साहित्याचा मानबिंदू ठरला. कोरोनाच्या महामारीत लॉकडाउनच्या काळात सर्व जग नैराश्याकडे झुकत असताना जीवनाच्या प्रसन्न प्रवासासाठी विलक्षण शब्दात मार्गदर्शन करणारे हे त्यांचे सहज-सोपे पुस्तक म्हणजे यशस्वी जीवनासाठी विचारांचा पुष्पगुच्छ. अखिल भारतीय मराठी साहित्य सम्मेलनातील ते व्याख्याते असून राष्ट्रीय साहित्य पुरस्कार समारोहांचे प्रमुख अतिथिही राहिले. गेल्या तीन दशकांमध्ये अनेक महत्त्वपूर्ण धोरणात्मक आर्थिक व सामाजिक विषयावर कार्य, संशोधन व लेखन तसेच आर्थिक साक्षरतेचे कार्य असे मोठे योगदान त्यांनी दिले. शिक्षणक्षेत्रातही त्यांचे योगदान असून 'मुंबई स्कूल ऑफ इकॉनॉमिक्स अँड पब्लिक पॉलिसी' या मुंबई विद्यापीठाच्या विश्वविख्यात संस्थेच्या संचालक मंडळाचे विद्यमान सदस्य आहेत. तसेच इतर विद्यापीठांच्या समित्यांवरही सदस्य राहिले आहेत. संस्कृत भाषेचे व प्राचीन भारतीय आध्यात्मिक तत्त्वज्ञानाचे ते अभ्यासक व उपासक असून योगविद्याप्रवीण आहेत. त्यांचे अध्यात्म वैज्ञानिक दृष्टीकोनावर आधारित आहे. तसेच चार दशकांपासून अत्यंत रसाळ वाणीने व विलक्षण शैलीने जनमनाचा ठाव घेणारे ते अमोघ व लोकप्रिय

वक्ते आहेत. बालपणापासून सुमधुर भावपूर्ण शास्त्रीय संगीत गाणारे ते सुरेल गायकही आहेत. विद्यार्थी–जीवनात स्पोर्ट्स, अभिनय, नेतृत्व अशा अनेक प्रांतात त्यांनी विहार केलेला आहे. दहावीच्या परिक्षेत पहिल्या क्रमांकाने उत्तीर्ण झाल्यानंतर लक्ष्मीनारायण बागेतील मध्यवर्ती मंडळाने त्यांचा गौरव केल्याचे ते आजही आवर्जुन सांगतात. राष्ट्रयज्ञात योगदान देणारा अर्थपूर्ण आणि बोधात्मक जीवनाचा आदर्श, शुद्ध आचार, विचार व संस्कार यांची त्रिमूर्ती' असे हे असामान्य, प्रतिभावंत, अष्टपैलू व्यक्तिमत्त्व देशस्थ ऋग्वेदी ब्राह्मण समाजाचे आणि आपल्या संपूर्ण देशाचे भूषण आहे. याचा आम्हास सार्थ अभिमान आहे.

**शब्दांकन : मिलिंद सरदेशमुख**

*With Best Compliments from*

**AVINASH PATIL** - 9322224550, 9821147636

**MAYUR PATIL** - 9324923020, 022 - 4306246

**MAYUR CATERERS**

Tawade Wadi, Room No. 5, Gr. Flr., Bhavani Shankar Road,
Chitale Path, Nr. Vartak Hall, Dadar (W), Mumbai - 400028

**SHRI YASH TOURS**

CELL : 9819148002
Central Railwaymen Society,
Plot No.41, Kalyan Road,
Dombivli (E) 421 201
Maharashtra State

SPECIALIZED : PACKAGED TOURS ALL OVER INDIA INSTANT HOTEL BOOKING TOURS ALL OVER INDIA & SOUTH EAST ASIA, AIR TICKETS
E-Mail : shriyashtours04@gmail.com

**कौटुंबिक वातावरणात दर्जेदार सहली**

| | |
|---|---|
| काश्मीर, श्रीनगर, सोनमर्ग, गुलमर्ग व पेहलगाम कारगील | ८ रात्र<br>१२ मे<br>खर्च प्रत्येकी रू.२५,५०० + विमान |
| हिमालयातील दोन धाम केदारनाथ व बद्रीनाथ | ८ रात्र<br>३१ मे<br>खर्च प्रत्येकी रू. २६,५०० + विमान |
| कारगील, लेह - लडाख, मनाली, श्रीनगर | ८ रात्र<br>१० जून<br>खर्च प्रत्येकी रू. ३५,५०० + विमान |
| स्टॅच्यू ऑफ युनिटी, बडोदा, गरूडेश्वर, | ३ रात्र<br>११ ऑगस्ट<br>खर्च प्रत्येकी रू. १३,००० + रेल्वे |
| राजस्थान ( मारवाड ) जयपूर, जोधपूर, जैसलमेर, बिकानेर | ६ रात्र<br>ऑगस्ट<br>खर्च प्रत्येकी रू. २५,५०० + रेल्वे व विमान |
| हिमालयातील चार धाम यमनोत्री, गंगोत्री, केदारनाथ, बद्रीनाथ | ११ रात्र<br>१० सप्टेंबर<br>खर्च प्रत्येकी रू. ३६,५०० + विमान |

MRH

Mukund R. Hulyalkar

painttech CONSULTANTS

**Generations Technology** **Changes BUT** **HULYALKAR SAME**

Visits :

**By Appointment Only**

Available on Phone

9.00 a.m. to 6.00 p.m. (For Local)

10.30 p.m. to 11.30 p.m. (For Outstation)

**Acrylic Distemper 2 Zinc Silicate**

**Complete Paint World**

**"Choice of Bright People"**

## Mukund R. Hulyalkar - Paint Technologist

| | | |
|---|---|---|
| President | : | Deshastha Rugvedi Brahman Sangh, Dadar |
| I. P. President | : | Colour Society U.D.C.T. Mumbai |
| Secretary | : | Karnataka Progressive Education Society, Mahim, Mumbai |
| Convener | : | ISSPA Central Committee |
| Secretary | : | Govindashram Co-Op. Hsg. Society |
| Patron Member | : | Winner's Circle - Thane |
| Member | : | BIS Committee CHD 20, New Delhi |
| Award | : | Udyogshree By Maharashtra State Government / ISSP Mitra |

Govindashram, (Near Hari Niwas), 224, L. J. Road, Dadar, Mumbai 400 028.
Mobile : 9821099494, Tel. : 022-24456214, Fax : 022-24314865
E-mail : painttech_con@yahoo.com, Website : www.painttechconsultants.com







## मध्यवर्तीत संस्थेत पारीत उपक्रम

१) माघी गणेश जयंती, २) दासनवमी उत्सव,
३) होलिका उत्सव, ४) शिवजयंती, ५) नाथ षष्ठी

## वाढदिवसाच्या हार्दिक शुभेच्छा!

संस्थेचे ज्येष्ठ सदस्य श्री. एन. बी. एच. कुलकर्णी (मुंबई)

श्री. हरिभाऊ जतकर (सोलापूर)

**R.N.I. 16775/68 Regd. No. MCW-126/2021-23,** Published on 4th of every month. Posted at MUMBAI PATRIKA CHANNEL SORTING OFFICE, GPO, Mumbai - 400 001 on, 15th Day of every month.




मुद्रक, प्रकाशक आणि संपादक **श्री. प्रभाकर अनंत संत** यांनी **अखिल देशस्थ ऋग्वेदी ब्राह्मण मध्यवर्ती मंडळा**च्या वतीने गुरुकृपा, शॉप नं. ३, रोझरी बिल्डिंग, एम.एम.सी मार्ग, माहीम (पश्चिम), ४०० ०१६, येथे छापून **अखिल देशस्थ ऋग्वेदी ब्राह्मण मध्यवर्ती मंडळ,** लक्ष्मीनारायण बाग, बाळ गोविंददास मार्ग, माहिम, मुंबई - ४०० ०१६ येथून अंक प्रकाशित केला. संपादक **श्री. प्रभाकर अनंत संत**